‘तांड्यावर’च्या ‘छबील्या’ला क्रेडीट कार्डचा सहारा!

पुणे, दि. २३ जानेवारी २०२४ : मनमाड जवळचा शंभर-सव्वाशे लोकवास्तीचा एक तांडा. त्यात तिघे चौघे भाऊ स्वतःचा चित्रपट बनवायचे स्वप्न बघतात काय, क्रेडीट कार्ड वर पैसे उचलतात काय आणि मोठ्या खटपटी करत एक अख्खा चित्रपट बनवतात काय, जो पोहचतो थेट आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात! सारेच चित्रपटातल्या कथेसारखी.

ही गोष्ट आहे, बाविसाव्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झालेल्या ‘छबिला’ या मराठी चित्रपटाची! जी गोष्ट साकार झाली आहे निर्माता आणि छायाचित्रकार अजय भालेराव आणि दिग्दर्शक-पटकथा लेखक अनिल भालेराव या सख्ख्या भावांच्या कल्पनेतून आणि मेहनतीतून.

चित्रपटाची पटकथा नाशिक जिल्ह्यातील मनमाड जवळ असणाऱ्या रघुवीर या लभाणांच्या एका तांड्याभोवती फिरते. लभाण ही बंजारा जमातीतील दगड फोडणारी अशी एक पोटजात, जिला कुठलेही सरकारी कागदपत्र नाहीत आणि पोटजातीचा पुरावा देखील नाही. अनिल आणि अजय हे दोघे भाऊ त्याच तांड्यातले. त्याच तांड्यातील युवकांना घेऊन त्यांनी चित्रपटाचे युनिट उभारले. दिग्दर्शक, कला दिग्दर्शक, निर्मिती व्यवस्थापक, कॉस्च्युम डिझायनर आणि चित्रपटांमधील कलाकारही त्याच तांड्यातील.

स्वतःचा चित्रपट बनवण्याचे स्वप्नं बघून ते मोठ्या पडद्यावर उतरवण्यापर्यंतचा त्यांचा हा प्रवास मात्र सोपा नव्हता. ‘पेटीएम’वर तीन लाखांचे लोन, दोन चार क्रेडिट कार्डस वरून घेतलेले पैसे, थोड्याफार बचती आणि इकडून तिकडून जुळवलेले पैसे, असे पाच लाखांचे बजेट समोर ठेवून ‘छबीला’चे शूटिंग सुरू झाले. तांड्यातीलच लोकांना जुळवून सेट उभा राहिला. ४० जणांचं युनिट तयार झाले. मित्राकडून घेतलेला कॅमेरा, आर्टिफिशियल लाईट्सची जुळवाजुळव, त्यातून केलेले वेगवेगळे ‘जुगाड’, सर्व काही कथे सारखे उत्सुकता वाढवणारे. ‘छबीला’चे पूर्ण शूटिंग होईपर्यंत २० लाखांचा खर्च झाला आणि आज पूर्ण शूटिंग झाल्यानंतर दिग्दर्शक अनिलवर सात लाखांचे कर्ज आहे.

एवढा सगळा खटाटोप करून चित्रपट बनवण्याची प्रेरणा कुठून मिळते, असा प्रश्न विचारला असता त्याचे उत्तर अनिल आणि अजय या दोन्ही भावांच्या प्रवासात आहे.

पटकथा लेखक अनिल मागील वीस वर्षांपासून लिखाण करतात. काही वर्षे खाणीत दगड फोडल्यानंतर ते थांबले. ते काम थांबवून त्यांनी लिहिलेल्या कथा घेऊन दिग्दर्शकांना आणि निर्मात्यांना आपली कथा आवडेल आणि त्याचा चित्रपट बनेल असे स्वप्न घेऊन ते मुंबईत गेले. परंतु अनेकांनी नाकारले. अपमान केलं. अशा वेळी आपला चित्रपट आपणच बनवायचा असे त्यांनी ठरवले.

धाकटा भाऊ अनिल मेकॅनिकल इंजनीअरिंग करत असतानाच फोटोग्राफी क्षेत्राकडे वळला. सुरुवातीला काही दिवस स्टील फोटोग्राफी केल्यानंतर नागराज दिवाकर या प्रथितयश छायाचित्रकाराच्या सल्ल्याने त्याने छायाचित्रणाची एक कार्यशाळा केली. त्यानंतर सिने क्षेत्रातील अनेक अनुभवी लोकांना अनेक

प्रकल्पांसाठी सहाय्यक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पण या सगळ्यात एक गोष्ट दोघाही भावांच्या कायमस्वरूपी डोक्यात होती, ती म्हणजे आपण स्वतःचा चित्रपट बनवायचा.

यामध्ये मग अनिलने लिहिलेल्या 'लभाण' या बंजारा जातीतील पोटजातीबद्दल, त्यांच्या दगड व्यवसायाबद्दल, आणि त्यांच्या आयुष्याबद्दल असलेली कथा निवडली. हीच कथा निवडण्यामागे आणि चित्रपट बनवण्यामागे नेमका काय उद्देश आहे असे विचारले असता, अनिलचे उत्तर खूप साधे आणि सरळ होते. "जसे इराणी लोक चित्रपटांमधे त्यांची कथा मांडतात, तशी आम्हाला आमची कथा पडद्यावर दाखवायची होती. 'लभाण' जमातीचे दुर्गम भागात जोखीम घेऊन जगणे, जगाला दाखवायचे होते. खाणींमध्ये राहून ही लोकं रोजगारासाठी दगड फोडतात, ज्यांची स्वप्नं,जगण्याच्या आशा,त्या दगडांमध्येच संपून जातात.

'छबीला'चे 'पीफ'मध्ये झालेले प्रदर्शन हे अनिल आणि अजय यांच्यासाठी मोठ्या पडद्यावरचे पहिले वहिले प्रदर्शन होते. आता ते हा चित्रपट वेगवेगळ्या महोत्सवात पाठवून प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याचा विचार करीत आहेत.